2020-21

डॉ. वाघेकर

शब्दसंचय

Shabdsanchay

Issue - II, Vol. I,
January-February 2021

Editor
Prof. Ganesh Digambar Saoji

पैनगंगा
प्रकाशन

Painganga Prakashan, Mehkar

©Publisher
ISBN - **978-81-947409-0-2**

Editor
Prof. Ganesh Digambar Saoji

Publishers
Painganga Prakashan, Mehakar
Email : paingangaprakashan@gmail.com
Mobile : 9975132211, 9850927424

Cover Page
Dilip Apre

Printers
Painganga Printing, Mehkar

Page Setting
Dr. Yajuwendra Wankar

Price
Rs. 1500

शब्दगंधचुय

Issue - II
Vol. I
Jan-Feb. 2021

ISBN - 978-81-947409-0-2

पैनगंगा प्रकाशन

REVIEW COMMITTEE

- Dr. Mustajeeb Khan
  Dr. Babasaheb Ambedkar Marthwada University, Aurangabad
- Dr. Kailas Ambhure
  Dr. Babasaheb Ambedkar Marthwada University, Aurangabad
- Dr. Sagar Jambhorkar
  CGOA, Gazette Officer Group A, Ministry of Defence, GOI, NDA, Khadakwasla, Pune, Maharashatra
- Dr. Taher Pathan
  HOD, Dept. of Marathi, Aligarh Muslim University, Aligarh, U. P.
- Prof. Sidique Mansuri
  Jazan University, Saudi Arebia
- Dr. Santosh Bansod
  BoS Chairman, SGB Amravati University, Amravati
- Dr. Vishal Panse
  LBSANGSAGC College S. Kherda, Maharashatra

शब्दगंधचुय

Issue - II
Vol. I
Jan-Feb. 2021

ISBN - 978-81-947409-0-2

पैनगंगा प्रकाशन

INDEX

1	१९२० चे नागपूर काग्रेस अधिवेशन प्रा. डॉ. रफिक शेख	1
2	डॉ. बाबासाहेब आंबेडकर संघर्षातून उत्कर्षाचा मूलमंत्र देणारे प्रेरणास्थान संघर्ष बळीराम सावळे, अनिल कान्हुजी दिपके	4
3	दहशतवाद आणि भारताची भुमिका बालाजी भाऊसाहेब दळवे	7
4	भागवतपुराणाधारे गृहस्थाला सदाचाराची दिशा प्रा.डॉ.मंजुश्री श्रीपाद नेव्हल	9
5	दलित स्त्रीवाद : एक व्यापक दृष्टिकोन **प्रा. डॉ. विष्णुपंत म. इंगवले.**	13
6	जैन साहित्य में वर्णित आर्थिक तत्त्वों का ऐतिहासिक अध्ययन डॉ. प्रा. कविता आर. तातेड	18
7	आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण प्रा.डॉ.मिलिंद भिवाजी कांबळे	29
8	**पंढरपुर विट्ठल मंदिर आंदोलनाचा ढाण्या वाघ : वैष्णववीर - रामदासबोवा मनसुख** **प्रा.डॉ. दत्तात्रय प्र. डुंबरे**	32
9	यशवंतराव चव्हाणांची समाज व साहित्यविषयक भूमिका राम गायकवाड	46
10	भारतीय स्त्रीयांचे मुक्तीदाते : डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रा.डॉ. ओमराज म.गजभिये	49
11	**ग्रामीण कादंबरी आणि जागतिकीकरणाचे चित्रण** **प्रा.आशालता नारायण खोत**	56
12	दलित लेखकांच्या आत्मकथनामधून अभिव्यक्त झालेली दलित स्त्री व्यक्तिरेखा ज्योती इंगळे	63
13	महिला सबलीकरण व सामाजिक स्थिती **काकासाहेब लक्ष्मण गरुड**	66
14	वामन होवाळ यांच्या कथेतील सामजिक सांस्कृतिक संघर्षाचे स्वरूप डॉ. करूणा अच्युतराव गायकवाड	68
15	कोल्हापूर संस्थनचा स्वातंत्र्य लढा एक नवा दृष्टीकोन प्रा.वसंत ज्ञानदेव ढेरे	71
16	कवी सुनील कुमरे यांच्या काही लक्ष्यवेधक कविता प्रा. डॉ. वाल्हेकर ज्ञानेश्वर अंबादास	77
17	**लोकसहभाग आणि ग्रामीण विकास** **डॉ. सुनील एस. शेटे, गणेश गुलाबराव पांढरे**	83
18	'वंचितांच्या शिक्षणातील सावित्रीबाई फुले यांचे योगदान'' डॉ. एम.के.शिंदे.	99
19	नागराज मंजुळे यांच्या उन्हाच्या कटाविरूद्ध या कवितासंग्रहातील जाणिवेचे वेगळेपण पल्लवी दिनकर जमधाडे	103

शब्दगंधचुय

Issue - II
Vol. I
Jan-Feb. 2021

ISBN - 978-81-947409-0-2

पैनगंगा प्रकाशन

१६

कवी सुनील कुमरे यांच्या काही लक्ष्यवेधक कविता

प्रा. डॉ. वाल्हेकर ज्ञानेश्वर अंबादास

प्रास्ताविक : सुनील कुमरे हे कार्यकर्ते आणि आदिवासी कवी आहेत. आदिवासी कवीच्या दुसऱ्या पिढीतील ते एक सृजनशील प्रतिभावंत आहेत. त्यांचा पहिलाच कवितासंग्रह 'तिरकमठा' १ (१९९९) साली प्रसिद्ध झाला. 'तिरकमठा' म्हणजे आदिवासी कुलभूषण धनुर्धर एकलव्याचे हे पारंपरिक व प्रहारी आयुध आहे.सुनील कुमरे यांची कविता आशय, अभिव्यक्ती, शब्दप्रतिमा, प्राक्कथा इ. च्या अनुषंगाने निश्चित आगळी वेगळी आहे. कारण डॉ. विनायक तुमराम म्हणतात की, ''एकलव्याच्या आंगठ्यातील रक्ताची झिरपण व असहय कळांचे मुकेपण तिरकमठ्याच्या रूपाने आज काही सांगू पाहते. व्यवस्थेने या वास्तवाचे गांभीर्य समजून घेतले पाहिजे. मुद्दाम चिघळवलेल्या सामाजिक व वाङ्मयीन वातावरणात ही कविता जन्माला आली आहे. त्यामुळे जबरदस्त आव्हान ठरावे अशीच तिची प्रवृत्ती व प्रकृती असणे स्वाभाविक आहे. एका जाणत्याने अजाणत्यांना धाडलेले रानजागराचे एक आग्रही आवतन म्हणजे ही कवीता!''२ या देशातील सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, वाङ्मयीन क्षेत्रातील विषमतेचा परिपाक म्हणजे या संग्रहातील सुनील कुमरे यांची कविता वाटते. कारण रानसंस्कृतीत राहणारा आदिवासी, त्यांचे पूर्वज, पूर्वजांचे ऐतिहासिक लढे, ऐतिहासिक शोषणाची परंपरा, वर्तमान शोषणाची परंपरा, त्यांचे सांस्कृतिक व आर्थिक जीवन या सर्वांचा आविष्कार ही कविता घडविते. भूक, भीषण दारिद्रय अमानुष छळ, व्यथा, वेदना हा या कवितेचा स्थिरभाव आहे. यामुळे सुशिक्षित आदिवासींना शिक्षणामुळे सजग भान आले. त्यामुळे सुनील कुमरे यांची कविता नकार, विद्रोह प्रकट करते. कवी सुनील कुमरे यांच्या काही लक्ष्यवेधक कविता खालीलप्रमाणे.

१.आदिवासी स्वातंत्र्यपर्वावर

या कवितेतून आदिवासी स्वायत्ततेची चर्चा सुरू असताना आदिवासीचे खिस्तीकरण व हिंदुकरण करण्याचे या देशातील धर्मांध शक्तीचे मनसुभे कवी लक्षात घेतात

''जय श्रीराम म्हणतोस आणि जहरी तिरांनी
तू आदिवासी ज्ञातीवंताचे मुंडके उडवतोस (पृ. १)

लायकी नसलेल्या मुर्खांच्या चरणी नतमस्तक होऊन वणव्याचा अध्यात्म सोयिस्करपणे विसरला जातो.
दलित राजकारणही आपआपल्या जातीचा अहंकार, अस्मिता, जोपासत असल्यामुळे आदिवासींचा स्वातंत्र्यसूर्य बिरसा मुंडा, नारायणसिंह उईके यांच्या कार्याचे केव्हा स्मरण होणार असा प्रश्न कविमनाला पडतो.

२.विश्लेषण

या कवितेतूनही कवीच्या समकालीन वर्तमान ताणतणावाचे दर्शन घडते. रामजन्मभूमी व बाबरी मशिदीच्या संघर्षात बाबरी उद्ध्वस्त झाल्यानंतरचा ताण कवीला असहय करतो

''मस्जिद उध्वस्त करून धर्मांध संघ म्हणाले,
हिंदूची अस्मिता आम्ही जागृत केली जय श्रीराम!''

अशा हिंदू अस्मितेत आदिवासीच्या काळोखाचे काय?

''आपण असे लंगोटी – चिरगूट कुठपर्यंत सांभाळायचे
भेदला पाहिजे तिरकमठ्यांनी आजवरचा काळोख, जय उलगुलान!''

शब्दगंधचुय

Issue - II
Vol. I
Jan-Feb. 2021

ISBN - 978-81-947409-0-2

पैनगंगा प्रकाशन

कवी वर्तमान परिस्थितीचं विश्लेषण करतात की, मंदिर निर्माणापेक्षा आमचे दारिद्रय किती दिवस जोपासत बसायचे? 'तिरकमठा' सारख्या आयुधाने सर्वंकष उलगुलानासाठी सिद्ध होण्याचे आवाहन कवी करतात. कारण मूळ निवासी आदिवासीना 'वनवासी' ठरविण्याचा प्रकाशन समारंभ राजकीय सत्ता व जातीयवादी मंडळीकडून होत आहे. याचे राजकीय भान कवीकडे आहे

''ही तर हिंदुमधील वनवासी संस्कृती
एकलव्य अंगठ्याच्या थारोळयात
उपेक्षितपणे अवाकच राहिला'' (पृ.४)

आदिवासीच्या वनवासीकरणात एकलव्य हा अंगठ्याच्या थारोळयात आश्चर्यचकित नजरेने उभा आहे.

३.मेळघाटी थडगे

या कवितेतून कवीने मेळघाटातील आदिवासींच्या कुपोषणाच्या भीषण समस्येबाबत दर्शन घडविले आहे. या प्रश्नांच्या अनुषंगाने आपल्या सर्वांच्या जाणिवा कशा बोथट झालेल्या आहेत, ते कवी सांगतात

''परंतु असा कसा पेटत नाही
कुपोषित थडग्याचा मेळघाटी वनवास!''

कुपोषित थडग्याचा मेळघाट का पेटत नाही, तर दुसरीकडे बोडोलँड, नागालँड, झारखंडातील आक्रोश ऐकण्याची कुणाचीच मानसिकता नाही. अशा अवस्थेत कवी उलगुलानचे रंग उधळण्याचे आवाहन करतात. आदिवासी हा 'टाडा' व 'झुणका भाकर योजना', 'नवसंजविनी योजना', 'जनावरांचे कज' या विविध शासकीय समीकरणात गुंतत जातो. अशा दांभिक सुविधाच्या उपचाराबाबत आदिवासीनी पेटून उठविण्याचे आवाहन कवी करतात.

४.गोटूलाच्या स्वप्नात

या कवितेतून कवीने गोंड आदिवासीमध्ये 'गोटूल' किंवा 'घोटूल' संस्कृती रुढ असल्याचे सांगितले आहे. म्हणजे समाजमान्य युवागृहांमध्ये आदिवासी तरुण–तरुणींचा मुक्त नाच – शृंगार असतो. या गोटूलाच्या स्वप्नांमध्ये धुंद असलेल्या फुलमतचे व्यक्तिचित्र कवीने रेखाटले आहे. गोटूलमध्ये धुंद होणाऱ्या फुलमतला कवीने काही उपरोधिक प्रश्न विचारलेले आहेत. चारित्र्य व बलत्कार म्हणजे काय? गोटूलमध्येच धुंद होणाऱ्या स्त्रीला कधी वास्तवाचे स्वप्न पडते का? तर नाही. वास्तवात अंगभर वस्त्र, पोटभर अन्न मिळते का? वास्तविक फुलमतची धुंदी म्हणजे वासनांची तृप्ती आहे. परंतु तुइयात रममाण होणाऱ्यांना खरं प्रेम कळणार नाही

''या शिष्ठांना नाही कळायचे प्रेम म्हणजे काय?
संगीत म्हणजे लिंगो
नृत्य म्हणजे मोठा देव
धरती जंगल म्हणजे माय – बाप (पृ. ९)

गोटूलातील नाच – गाणे, संगीत म्हणजे केवळ कामप्रेरक भावना नाही तर गोंड देवता लिंगोची ती आराधना ठरते.

५.विदीर्ण माय

या कवितेतून कवीने आदिवासी 'माय' भोवतीचं सामाजिक विश्व रेखाटलं आहे. १५ ऑगस्ट १९९७ ला भारतीय स्वातंत्र्याचा सुवर्णमहोत्सव साजरा होत असताना आदिवासी 'माय' ची मात्र विदीर्ण परिस्थिती रेखाटली आहे. तिच्या जीवन जगण्याच्या वास्तव जीवनापेक्षा तिच्या हातावरील गोंदणे आर्ट गॅलरीत कलात्मक होते. स्वातंत्र्योत्तर पन्नास वर्षानंतर या आदिवासी 'माय'च्या जीवनात भूक, दारिद्रय, अन्न, वस्त्र, निवारा या प्रश्नांची चिंता गंभीर स्वरूप धारण करते. भारतीय स्वातंत्र्यासाठी आदिवासी स्वातंत्र्यवीरांनीही प्राण पणाला लावले असताना स्वातंत्र्याची फळे आदिवासी 'माय' पर्यंत पोहचू शकली नाहीत. आदिवासींच्या सांस्कृतिक सण–उत्सवाच्या गजबजाटामुळे 'माय'ला वास्तव जीवनाची जाणीवच होऊ दिली जात नाही. स्वातंत्र्याचा सुवर्णमहोत्सव धुमधडाक्यात साजरा होत असताना

''घाट्यासाठी सरणावर जळणारे तुझे तृप्त आयुष्य
कधीच का पेटत नाही?'' (पृ. १३)

शब्दगंधा
Issue - II
Vol. I
Jan-Feb. 2021
ISBN - 978-81-947409-0-2
पैनगंगा प्रकाशन

अन्न आणि भुकेसाठी या 'माय'ला उभे आयुष्य जाळावे लागते. अशा अवस्थेत ती 'माय' पेटून का उठत नाही? असा प्रश्न कवी विचारतात. कवीने मात्र या 'माय' ची परिस्थिती बदलण्यासाठी, काळोखातून प्रकाश निर्माण करण्यासाठी उरात जळती मशाल घेऊन पांढऱ्या रेषा निर्माण करायच्या आहेत.

६.मला नकोच तुमचे

या कवितेतून आदिवासी मन आता शिक्षणाने जागृत आणि सजग झाल्याचा भाव प्रकट होतो. 'वनवासी' संस्कृतीच्या लेण्याला कवी नाकारत आहे. आदिवासींना दया, सहानुभूती नको आहे. कारण आम्ही या भूमीचे मूळ मालक आहोत. असे असूनही प्रस्थापित ज्ञान परंपरेचे आम्ही बळी आहोत

''मला नकोच तुमचे ज्ञानमंदिर
ज्यात पुरले आहेत सत्याचे गर्भ,
आणि निष्पाप बळी
शंबुक – कर्ण – एकलव्यांदिसारखे''(पृ.१६)

ज्या अभिजनांनी शंबुक–कर्ण–एकलव्य या सर्वांना छळले, उपेक्षित, वंचित ठेवले, त्या अभिजनांच्या ज्ञानपरंपरेला कवी नाकारतात. दुसरीकडे 'समतेचा शिरच्छेद' या कवितेतून समरसतेचा बुरखा फाडतात. कारण प्राचीन इतिहासात ज्यांच्या पूर्वजांनी आदिवासींच्या पूर्वजांना छळले, त्यांचा बळी घेतला, शोषण लादले, त्याच पूर्वजांच्या आजच्या वारसदारांकडून आदिवासींना समतेची वरपांगी शिकवण मिळते. हा विषमतेचा कुटील डाव खेळला जातो आहे.

''अलीकडे समतेच्या वरपांगी तत्त्वज्ञानात
मुखपृष्ठ सत्त्वशील समानतेचे असले तरी
अर्थ मात्र विषमतेने ठासून भरलेला असतो'' (पृ. १८)

समतेचा सात्त्विक मुखवटा धारण करणाऱ्यांत विषमताच ठासून भरलेली असते. अशा दांभिक समतेचं चित्रण कवीने केले आहे.

७.अनामिक थडगे

या कवितेतून झाडीपट्टीत, रानडोंगरात आदिवासींच्या अस्तित्वाच्या पाऊलखुणा शोधताना नातेवाईकांचे बरबटलेले थडगे कवीला गवसते. या थडग्यांचा अस्मितेचा हुंकार चेतविण्यासाठी कवीला उपयोग होतो

''जेव्हा केव्हा थडगे दुभंगतील
तेव्हा तेव्हा संग्रामाचा अविस्मरणीय
लाव्हा उफाळेल'' (पृ. २७)

आदिवासी स्वातंत्र्यवीरांची थडगी ही कवीची प्रेरणाशक्ती आहे. थडगे दुभंगून जेव्हा लाव्हा उफाळेल तेव्हा आदिवासींच्या जीवनातील काळोख नाहीसा होईल, असा कवी आशावादी आहे.

८.राष्ट्रीय प्रवाहात आदिवासी

ही या संग्रहातील अतिशय लक्षवेधक कविता आहे. आदिवासी हे मूळ निवासी अनार्य असताना, या देशाचा मुख्य प्रवाह असताना 'राष्ट्रीय' प्रवाहाच्या मोहजालात गुंतविले जात आहे. वास्तविक

''उध्वस्त करून तटबंदी शहरे
अनार्य आदिवासींना पिटाळले रानोवनी
आज या आर्यांना सेवेचे फुटलेत झरे'' (पृ. ३३)

ज्या आर्यांनी अनार्य आदिवासींना जंगलात पिटाळले, त्यांच्याच आजच्या वारसदारांनी 'मागासलेले हिंदू' म्हणून त्यांच्यात वरपांगी समाजसेवेचे झरें निर्माण केले आहेत. राष्ट्रीय प्रवाहात आदिवासींनी सामील होण्यासाठीच –

''राष्ट्रीय हितासाठी पहाडी गिरी कुहरात
राष्ट्रीय अभयारण्य असावे
धरणे प्रकल्प कारखाने असावे'' (पृ. ३३)

शब्दगंधचुय

Issue - II
Vol. I
Jan-Feb. 2021

ISBN - 978-81-947409-0-2

पैनगंगा प्रकाशन

राष्ट्रीय प्रवाहात सामिलीकरणासाठी आदिवासी परिसरात अभयारण्य, धरणे–प्रकल्प, कारखाने उभारून आदिवासींना विस्थापित करणे राष्ट्रीय प्रवाह होतो काय? असा प्रश्न कवी उपस्थित करतात. आदिवासींनी स्वत:चा धर्म, संस्कृती, भाषा, प्रादेशिक परिसर सोडणं म्हणजे राष्ट्रीय प्रवाह होतो काय? असा दुसरा प्रश्न कवीला पडतो. जे राष्ट्रीय प्रवाहात सामील होणार नाही, त्यांच्यासाठी –

''जे न प्रवाहात वाहती
त्यासाठी ''वनवासी'' आश्रम
''टाडा'' आणि ''नक्षलवादी बारुद'' असावे'' (पृ.३३)

जे या प्रवाहात सामील होणार नाही त्यांना वनवासी ठरविणे, 'टाडा'खाली बंदिस्त करणे किंवा नक्षलवादी ठरविले जाते. याउलट या प्रवाहात सामील होणाऱ्यांसाठी शासकीय सुविधांचा सुकाळ निर्माण केला जातो. उदा. घरकुल, वीज, रेशनकार्ड, शेळया–म्हशी, कोंबड्यांसाठी बँक कज, झुणका भाकर, नवसंजीवनी इ.चा दांभिक प्रचार केला जातो.

आदिवासींमध्ये जात – जमात जाणीव प्रबळ आहे. आदिवासी अस्तित्वाच्या निश्चित समीकरणासाठी विविध जमातविरहित समाजरचना आवश्यक आहे. त्याशिवाय गोंड भूतलावर त्यांचे स्वतंत्र अस्तित्व सिद्ध होणार नाहीत, ही कवीची सामाजिक जाणीव 'गोंडवनाच्या पेटत्या भूतलावर' या कवितेतून व्यक्त होते

''अस्तित्वाच्या निश्चित समीकरणासाठी
गोंड–परधान – थोटी उतरंड उध्वस्त करावीच लागेल
ही टाकावू परंपरा नाकारावीच लागेल'' (पृ.५०)

तरच येणाऱ्या युगात गोंडवनाच्या पेटत्या भूतलावर 'आदिवासी' म्हणून शिल्लक राहील. अन्यथा अस्तित्वहीन बनून जगावे, मरावे लागेल. शहरी, मध्यमवर्गीय कलाकारांनी केवळ कुतूहल, जिज्ञासेपोटी आदिवासींच्या सांस्कृतिक जीवनाचा जहांगीर आर्ट गॅलऱ्यांमध्ये कलेच्या नावाखाली बाजार मांडला आहे. व्यवहारी व व्यापारी रूप प्राप्त झाले आहे. उदा.

''कुतूहलाच्या मनुनिष्ठ जहांगीर आर्ट गॅलरीत तू
गोंडवनातील सांस्कृतिक रंगमचावरील कोलार्ज ठरलास.''(पृ.५०)

९.पेंदोरे–पेंढारकर

ही कविता आदिवासींच्या सांस्कृतिक भ्रष्टपणावर प्रकाश टाकते. गेल्या एक ते दोन दशकांपासून आदिवासी समाजपरिवर्तनाच्या दांभिक बुरख्याखाली आदिवासींनीच आपली आडनावे बदलण्याचा जो घाट घातला आहे, त्याचे वर्णन करणारी ही कविता आहे. ''फुले–आंबेडकरांशिवाय आदिवासीत परिवर्तन अशक्य'' अशी भलावण करणारेही या नामकरणातून सुटले नाहीत. आडनावे बदलण्याचा प्रयत्न म्हणजे मूळनिवासीपण स्वत:हून नाकारण्याचा हा भाग आहे. अपराधीपणाची भूमिका घेणे हा कवीला सांस्कृतिक भ्रष्टपणा वाटतो.

''पेंदोर–पेंढारकर
आत्राम – चांदेकर
गेडाम – राजगडकर
कुळसंगे – कुलकर्णी
आणि वाढला भ्रष्टपणा आदिवासी संस्कृतीत'' (पृ. ५४)

या अशा नामकरणामुळे आदिवासीचे अस्तित्वच पुसले जाणार आहे. ही आत्मपरीक्षणाची जाणीव व्यक्त होते. ही जाणीव प्रखर ठेवण्यासाठी कवीने तिरकमठ्याचा वेध घेतला आहे.

१०.संदर्भ युगाचे –एकलव्य

ही सुनील कुमरे यांची व्यक्तिचित्रणात्मक कविता आहे. आदिवासी कुलभूषण धनुर्धर एकलव्याची ज्ञानाच्या क्षेत्रातील शूरत्वाची तेजस्वी गाथा कवीने गायली आहे. एकलव्याचा आकांत, विद्रोह हा कवीचा प्रेरणा स्त्रोत आहे. एकलव्याचा संदर्भ स्वीकारून फिनिक्स ठरलेल्या कवीने बंडाचा पवित्रा घेतला आहे.

''एकलव्या! आंगठ्याचे दान मागणाऱ्या युगाविरुद्ध
मी युद्ध पुकारले पण!
कारण द्रोणाच्या पाईकांची शक्यता नाकारता

शब्दगंधचुय

Issue - II
Vol. I
Jan-Feb. 2021

ISBN - 978-81-947409-0-2

पैनगंगा प्रकाशन

येत नाही.'' (पृ. ५९)

अंगठा शाबूत ठेवण्याचे आश्वासन घेऊन द्रोणाचे पाईक, वारसदार दगाबाजी करणार नाहीत याची शक्यता आजमावली आहे.

११.विरांगणा राणी दुर्गावती

ही कविताही व्यक्तिचित्रणात्मक आहे. कवीने गोंडवन स्वातंत्र्याची देवता वीरांगना राणी दुर्गावती यांची 'विरांगणा', 'वनमाता', 'शूरमाता' या तीन रूपात तिची कर्तबगारी काव्यबद्ध केली आहे. गोंडवनाच्या स्वातंत्र्यासाठी, आदिवासींच्या अस्तित्वासाठी परकीय साम्राज्यवादी सत्तेशी तिने संघर्ष दिला होता. तिचा हा संघर्ष आदिवासी कवीचा मूलमंत्र आहे. त्यातून कवीला प्रेरणा मिळते. लढण्याचा संदेश मिळतो. बेईमान फितुराशी लढताना –

''तुझ्या विरश्रीचा बाणा गोंडवन राष्ट्रासाठी
तू लढलीस आदिवासी इतिहास घडविण्यासाठी''

या शूर वीरांगनेच्या विचारांचे वाटाडे कवी होतात. या शूरमातेशी कवी आपले अनुसंधान जोडतो आहे.

१२.शहिद बाबुराव पुलेसूर शेडमाके

ही कविताही व्यक्तिचित्रणात्मक आहे. गोंडवनातील आदिवासींचं स्वातंत्र्य शेठ, सावकार व इंग्रजांपासून शाबूत राहावे, यासाठी शहीद झालेले बाबूराव शेडमाके हे थोर स्वातंत्र्यसेनानी होते. अशा स्वातंत्र्यसेनानींचा प्रखर लढा मनुनिष्ठ इतिहासकारांनी इतिहासात नोंदविला नाही. परंतु गोंडाच्या मना – मनावर मात्र त्यांच्या लढ्याच्या स्मृती कोरलेल्या आहेत. कवी या वनवीराला अभिवादन करताना, त्यांचे बलिदान व्यर्थ जाणार नाही, अशी भावना काव्यबद्ध करतो आहे

''पण तुझे बलिदान व्यर्थ गेले नाही
तुझ्या रक्ताने समृद्ध झाली आहे येथील नापीक जमीन'' (पृ. ६३)

आदिवासींची व्यथा, वेदना वांझोटी नाही. त्यातूनच विद्रोहाचा वणवा पेटल्याशिवाय राहणार नाही. हा आत्मविश्वास प्रकट होतो आहे.

१३.बिहारचा स्वातंत्र्यसूर्य भगवान बिरसा मुंडा

ही कविताही व्यक्तिचित्रणात्मक आहे. बिहारमधील केवळ मुंडा जमातीचाच नव्हे तर समग्र आदिवासीचा कैवार घेणाऱ्या स्वातंत्र्यसूर्य असलेल्या भगवान बिरसा मुंडाप्रती कवीची प्रतिबद्धता सिद्ध होते. शेठ–सावकार, मालगुजार, ख्रिस्ती मिशनरी, इंग्रज या सर्व शोषकांच्या विरोधात समस्त आदिवासीना बिरसाने संघटित केले होते. प्रखर जनलढ्याचे नेतृत्व केले होते. आदिवासीना रान, जंगलाचा अधिकार व स्वातंत्र्य मिळविण्यासाठी बिरसाने प्राण पणाला लावले होते. असा क्रांतिकारक वारसा कवीने आपल्या मनाशी जपला आहे. बिरसानंतरही स्वातंत्र्योत्तर काळात आदिवासीवरील अमानुष अत्याचार थांबलेले नाहीत. गुलामगिरी, वेठबिगारी, दारिद्रय उपासमारीत वाढच झालेली आहे. म्हणून आदिवासीच्या वर्तमान अस्तित्वाच्या लढ्यामध्ये बिरसा सहभागी होतो. आदिवासी कार्यकर्त्यांना विद्रोहाचं बळ, सामर्थ्य तो बहाल करतो आहे

''स्वातंत्र्योत्तर दलाल... गुलाम करीत आहेस तुझ्याभूमीला,
म्हणूनच बिरसा! तू जगतोस आमच्यात
तू पेटवतोस आम्हाला...''(पृ. ६५)

असामान्य युगपुरुष असलेला बिरसा सामान्य आदिवासीमध्ये, त्यांच्या जगण्यामध्ये सामील होऊन त्यांना हक्क व अधिकारासाठी पेटवत आहे. कारण सर्वच परकीय सत्ताधाऱ्यांच्या शोषक पावसांनी आम्ही चिंब झालो आहोत. त्या सत्ताधाऱ्यांमध्ये आर्य, तुर्क, मुस्लीम, मराठे, इंग्रज इ. आहेत. या सर्वांमुळे बिरसाची आग व विद्रोह शमला नाही. असा आत्मविश्वास कवी प्रकट करतात.

'तिरकमठा' मधील कवितेबद्दल प्रा. डॉ. विनायक तुमराम म्हणतात की,''अकाली अवसेचे फसवे ाहाणपण या कवितेने धिटाईने नाकारले आहे. चेतण्या–चेतवण्यासाठी पाडयाटोल्यावरील सगासाथींना तिने हाकारले आहे. वांझ

शब्दगंधचुय

Issue - II
Vol. I
Jan-Feb. 2021

ISBN - 978-81-947409-0-2

पैनगंगा प्रकाशन

कुसांनी आणलेला वेदनांचा आव ती समजून आहे. प्रश्न समस्यांसकट गिरीकुहरातील नादनिदान व वाद – संवादही तिने वेचले आहेत. आदिवासी कवींच्या दुसऱ्या पिढीतील कवी सुनिल कुमरे यांचे नि ठा आणि सचोटी यांनी संस्कारलेले हे वाङ्मयीन कर्तृत्व निश्चितच दखलपात्र आहे.''३ डॉ.विनायक तुमराम यांच्या मताचे प्रत्यंतर आपणास सुनिल कुमरे यांच्या वरील काही निवडक लक्ष्यवेधक कवितेतून घडते. कवीने स्वत: बद्दलच म्हटले आहे की, ''कवी म्हणून मिरवण्याची हौश मला नाही. परंतु ही एक सच्चा भावनेतून अवतरलेली कलाकृती आहे. रानातील जर्जर जखमांची आणि ओबड्धोबड भग्न अवशे ांची ही प्रामाणिक दखल आहे''४ कवीचे हे मत साधारपणे आपणास वरील विवेचनातून जाणवते.

कवितेमधील मधील प्रतिमाविश्व

आदिवासीच्या जागृतीचा वणवा सोयिस्करपणे विसरला जात आहे. 'अंकुश' या कवितेत प्रस्थापितांचे अश्रू मतलबी असतात. वेदनेच्या मशाली होतात. आदिवासी म्हणजे 'मागासलेले हिंदू' म्हणून आर्याच्या सेवेचे 'झरे' निर्माण झाल्याची जाणीव प्रकट होते.

कवितेची वैशिष्टये

१) रानजागराची कविता.
२) १९९० नंतरच्या धार्मिक उन्मादाचे चित्रण करणारी कविता.
३) आवाहन क्षमतेची कविता.
४) संवादात्मकता हे तिचे महत्त्वाचे वैशिष्टये आहे.
५) नकार, विद्रोहाची कविता.
६) वस्तुनिष्ठ ऐतिहासिक आकलन घडविणारी कविता.
७) अस्मिता जागराची कविता.
९
८) उपरोधिकता.
९) राजकीय भाष्य करणारी कविता.
१०) वर्तमान वास्तवाची जाणीव असलेली कविता.
११) आदिवासी कुलभूषण एकलव्य, गोंड महाराणी दुर्गावती, बिरसा मुंडा, बाबूराव शेडमाके, तंट्या भिल्ल, उमाजी नाईक, उमेड वसावा, व्यंकटराव आत्राम, शंकर शहा, रघुनाथ शहा इ. चा वारसा सांगणारी कविता.

संदर्भग्रंथ

१. कुमरे सुनिल, तिरकमठा, हरिवंश प्रकाशन, चंद्रपूर, १९९९
२. कुमरे सुनिल, तिरकमठा, हरिवंश प्रकाशन, चंद्रपूर, १९९९ (मलपृ ठावरून)
३. तुमराम विनायक, (संपादन) ातकातील आदिवासी कविता, हरिवंश प्रकाशन, चंद्रपूर, २००३, पृ. १०१
४. तुमराम विनायक, आदिवासी साहित्य दिशा आणि दर्शन, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्र. आ. १५ नोव्हेंबर २०१२, पृ.४